# तालुका निवड समिती,तहसीलदार शिरुरकासार यांचे कार्यालय

## कोतवाल पदाची सरळ सेवा भरती निवड प्रक्रिया-२०२३

जाहिरात क्रमांक -२०२३/मशाका/आस्थापना/कोतवाल भरती/कावि- दिनांक. ०४.०८.२०२३

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक केओटी-२०१२/प्र.क्र.४३२/ई-१० दिनांक ५ सप्टेंबर २०१३ व शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प.क्र.१७/ई-१० दिनांक १७.०५.२०२३ अन्वये व शासन निर्णय क्रमांक पीकेए १०५९/VI-L,बॉम्बे सरकार, सचिवालय, बॉम्बे दिनांक ०७.०५.१९५९ कोतवाल सेवाप्रवेश नियमानुसार कोतवालाची रिक्त पदे भरती करणे बाबत आदेशीत करण्यात आल्यामुळे तसेच मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण -२०२३/ प्र.क्र.१७/ई-१० दिनांक १७.०५.२०२३ नुसार राज्यातील कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या ८० टक्के मर्यादित पदे भरण्यास एक विशेष बाब म्हणून मान्यता दिलेली आहे.

मा.जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक २०२३/आर.बी./आस्था-१/कोतवाल भरती/कावि- दि.२०.०७.२०२३ सुधारीत कार्यक्रमा अन्वये तहसीलदार, शिरुरकासार यांचे आस्थापनेवरील अवर्गीकृत कोतवाल संवर्गामधील मा. विभागीय आयुक्त (मावक) विभाग, औरंगाबाद यांचे बिंदू नामावली तपासणी अहवाल क्रमांक जा.क्रं.२०२३/मावक/कक्ष-२/सिआ-२०७/कावि-दिनांक १०.०७.२०२३ नुसार कोतवाल संवर्गाचे जात प्रवर्गानुसार एकुण ०८ रिक्त पदे भरण्याकरिता बिंदुनामावलीस मान्यता दिलेली आहे. परंतु मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण - २०२३/ प्र.क्र.१७/ई-१० दिनांक १७.०५.२०२३ नुसार कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या एकुण पदांच्या ८० टक्के मर्यादित पदे भरण्यास एक विशेष बाब म्हणून मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शिरुरकासार तालुका क्षेत्रातील कोतवाल संवर्गाची ८० टक्के प्रमाणे ०६ रिक्त पदे भरण्याकरीता खालील प्रमाणे प्रवर्गनिहाय उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

कोतवालांच्या रिक्त पदांचे आरक्षण

(मासिक एकत्रित मानधन रुपये १५०००/-)

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | महिला | समांतर आरक्षणाशिवाय भरावयाची पदे | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | ०० | ०१ | ०१ |
| २ | भजक | ०० | ०१ | ०१ |
| ३ | भजड | ०० | ०१ | ०१ |
| ४ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | ०० | ०१ | ०१ |
| ५ | अराखीव/ खुला | ०१ | ०१ | ०२ |
| | एकुण | ०१ | ०५ | ०६ |

टिप:--१. पदाच्या एकूण संख्येमध्ये व आरक्षणात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

Scanned with CamScanner

अटी व शर्ती

१. शैक्षणिक अर्हता :-

१.१. उमेदवार किमान चौथी उत्तीर्ण असावा.

१.२. उमेदवारास मराठी भाषा लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे .

२. वयोमर्यादा :-

२.१. उमेदवाराचे वय दिनांक १८.०८.२०२३ रोजी १८ ते ४० दरम्यान असावे .

२.२. कोतवाल हे पद वर्ग चार संवर्गात मोडत नाही व सदरील पद हे अवर्गीकृत असल्यामुळे अपंग, प्रकल्प/भूकंपग्रस्त, अंशकालीन, खेळाडू, माजी सैनिक इत्यादीसाठी देण्यात आलेली वयोमर्यादेतील शिथीलता व आरक्षण कोतवाल भरतीसाठी लागू असणार नाही .

३. उमेदवार हा शिरुरकासार तालुक्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र व लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. निवड झालेल्या उमेदवारांनी शारीरिक क्षमतेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल .

५. या जाहिराती अन्वये करण्यात येणारी भरती संपूर्ण तालुका हा एक घटक गृहीत धरून करण्यात येत असल्यामुळे निवड होणाऱ्या उमेदवारांच्या नियुक्तीसाठी त्यांच्या राहण्याच्या ठिकाणांचा कोणताही विचार न करता तालुका अंतर्गत रिक्त असलेल्या कोणत्याही ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल व तालुका अंतर्गत बदलीस पात्र राहतील. त्याकरिता उमेदवारांने रुपये १०० चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र देणे आवश्यक आहे .

६. उमेदवारांची नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील .

७. कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्यामुळे सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळणार नाहीत .

८. मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र अंतिम निवडीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील . निवड होणाऱ्या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब दिनांक १२.१२.२०११ अन्वये संबंधित उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती दिली जाईल. जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहून दिल्यानंतर विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची सेवा संपुष्टात येईल.

९. अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती वगळून अन्य प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारासाठी चालु आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकित करून आवेदन पत्रासोबत जोडावी. (नॉन क्रिमीलेअर चे तत्व अनुसूचित जाती /जमाती या प्रवर्गा व्यतिरिक्त अन्य सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील ).

Scanned with CamScanner

१०.आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२.०२.२०१९ व दिनांक ३१.०५.२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील .

११.महिला उमेदवाराकरिता :-

११.१. महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दिनाक ०४.०५.२०२३ अन्वयें खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही .

११.२. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छीणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१२.परीक्षा शुल्क सदर परिक्षेकरिता खालील प्रमाणे शुल्क राहील .

१२.१. मागासवर्गीय उमेदवाराकरिता ४००/- रुपये .

१२.२. अराखीव/ खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता ५००/- रुपये.
वरील प्रमाणे परीक्षा शुल्क **तहसीलदार, शिरुरकासार** या नावाने राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष डी.डी.(डिमांड ड्राफ्ट) अर्जासोबत सादर करावा.
(परीक्षा शुल्क बॅंक प्रोसेसिंग चार्जेस तसेच त्यावरील देय कर वगळून आहेत.).

१२.३. परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-Refundable) राहील.

१३.निवड पद्धती :-

१३.१. महसुल व वनविभाग शासन निर्णय दिनांक १७.०५.२०२३ नुसार १०० गुणांची लेखी परीक्षा असेल. **लेखी परीक्षा दिनांक ०३.०९.२०२३ रोजी सकाळी ११ :०० ते १२:३० दरम्यान** प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात आलेल्या ठिकाणी घेण्यात येईल.

१३.२. गुणवत्ता क्रम हा लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर म्हणजेच एकूण १०० गुणांपैकी मिळालेल्या गुणांच्या आधारावर राहील .

१३.३. लेखी प्रश्नपत्रिका इयत्ता चौथी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल .

१३.४. लेखी परीक्षेत सामान्य ज्ञान, अंकगणित, मराठी भाषा विषय व जिल्ह्याची भौगोलिक माहिती यांचा समावेश राहील .

१३.५. लेखी परीक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्ता धारण करणाऱ्या उमेदवारांना मूळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

१३.६. समसमान गुण असल्यास दिनांक २७.०६.२००८ चे शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल .

१३.७. निवड करण्यात आलेले उमेदवार निवड झाल्यापासून १५ दिवसाच्या आत रुजू न झाल्यास प्रतिक्षाधिन यादी मधील दुसरे उमेदवार यांची नियुक्ती करण्यात येईल .

Scanned with CamScanner

१४.अर्ज कसा करावा :-

१४.१. सदर पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना तहसील कार्यालय.शिरुरकासार येथे रुपये २०/- शुल्क भरुन उपलब्ध होईल. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर http://beed.gov.in वर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

१४.२. जाहिराती सोबत प्रसिद्ध करण्यात येत असलेल्या विहित नमुन्यातील अर्ज त्यामधील माहिती/ तपशील सुस्पष्टपणे नमूद करून सादर करावा .

१४.३. अर्जासोबत स्वतःचे नाव व पत्ता नमूद केलेला व रुपये ५ चे पोस्टाचे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

१४.४. उमेदवाराने त्यांचे अलीकडील काळातील छायाचित्र आवेदन पत्रावर विहित जागी स्वसाक्षांकित करून घट्ट चिटकावे .

१४.५. शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात .

१४.६. अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकित करून जोडावी .

१४.७. अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती व्यतिरिक्त सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे चालु आर्थिक वर्षातील नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी .

१४.८. महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

१५. **अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख व कार्यालयाचा पत्ता :-**

१५.१. उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज सहपत्रासह तहसील कार्यालय,शिरुरकासार येथे समक्ष अथवा पोस्टाने दिनांक १८.०८.२०२३ पर्यत कार्यालयीन वेळत पोहचतील अशा बेताने दाखल करावेत.

१५.२. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्यासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच या संबंधाने उमेदरांसमवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही .

१६.विहीत नमुन्यातील नसलेल्या अर्ज. विहित शुल्क भरणा न केलेल्या उमेदवाराच्या अर्ज. विहित शैक्षणिक अर्हता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज. अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज. फोटो नसलेला व स्वसाक्षांकित न केलेला अर्ज आणि विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही .

१७. या जाहिरातीला अनुसरून ज्या उमेदवाराचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवाराचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी शासनाकडे, जिल्हाधिकारी कार्यालयास, उपविभागीय कार्यालयास किंवा तहसील कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत .

१८.अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा सदरील अर्ज अपात्र ठरविण्या येईल.

Scanned with CamScanner

१९. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननीअंती पात्र/अपात्र उमेदवारांच्या यादी तहसील कार्यालय,शिरुरकासार येथील नोटीसबोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.पात्र असलेल्या उमेदवारांना परीक्षेचे स्थळ व वेळ प्रवेशपत्राद्वारे लेखी स्वरूपातकळविण्यात येईल.

२०. लेखी परीक्षेसाठी उमेदवारांनी प्रवेश पत्रावरील दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

२१. ज्या उमेदवारांना पोस्टाने प्रवेश पत्रे प्राप्त झाले नाहीत अशा उमेदवारांनी ठरवून दिलेल्या कालावधीत तहसील कार्यालय,शिरुरकासारयेथून प्रवेश पत्र हस्तगत करावीत.

२२.उत्तर तालिका:-

a. उत्तर तालिका तहसील कार्यालय शिरुरकासार येथील नोटीसबोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल.

२३.लेखी परीक्षेचा निकाल उमेदवारांच्या आसन क्रमांकाची यादी तहसील कार्यालय,शिरुरकासार व उपविभागीय अधिकारी कार्यालय,बीड येथील नोटीसबोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल.

२४.अंतिम निवड झालेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी तहसील कार्यालय,शिरुरकासारयेथे होईल. मूळ कागदपत्रांची पडताळणीत पात्र उमेदरांचीच निवड वैध समजण्यात येईल. कागदपत्रे पडताळणीनंतरचअंतिम निवड यादी तहसील कार्यालय,शिरुरकासार व उपविभागीय अधिकारी कार्यालय,बीड येथील नोटीसबोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल.

२५.कोतवाल भरतीचाकालबद्ध कार्यक्रम खालील प्रमाणे:-

| अ.क्र. | बाब | कालावधी (दिनांक) | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | अर्ज दाखल करणे | दिनांक ०८.०८.२०२३ ते दिनांक १८.०८.२०२३ (सार्वजनिक सुटटीचे दिवस वगळुन) | कार्यालयीन वेळेत | तहसील कार्यालय, शिरुरकासार |
| २ | लेखी परीक्षेसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दिनांक २२.०८.२०२३ | कार्यालयीन वेळेत | १ .तहसील कार्यालय,शिरुरकासार<br>२. उपविभागीय अधिकारी कार्यालय,बीड<br>३ .जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://beed.gov.in प्रसिध्द करण्यात येईल. |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | ज्यांना प्रवेशपत्र पोष्टाने प्राप्त झाले नाहीत अशा उमेदवारांना तहसील कार्यालयातुन प्रवेशपत्र देणे | दिनांक २९.०८.२०२३ व दिनांक ३०.०८.२०२३ | कार्यालयीन वेळेत | तहसील कार्यालय, शिरुरकासार |
| ४ | लेखी परीक्षा | दिनांक ०३.०९.२०२३ | सकाळी १२ ते ०१.३० | प्रवेश पत्राद्वारे पोष्टाने कळविण्यात येईल. |
| ५ | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द करणे | दिनांक ०४.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | १ .तहसील कार्यालय,शिरुरकासार<br>२. उपविभागीय अधिकारी कार्यालय,बीड<br>३ .जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://beed.gov.in प्रसिध्द करण्यात येईल. |
| ६ | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर काही आक्षेप/हरकती असल्यास त्या सादर करणे. | दिनांक ०५.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | तहसील कार्यालय,शिरुरकासार |
| ७ | अंतिम उत्तरतालिका प्रसिध्द करणे | दिनांक ०६.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | १ .तहसील कार्यालय,शिरुरकासार<br>२. उपविभागीय अधिकारी कार्यालय,बीड<br>३ .जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://beed.gov.in प्रसिध्द करण्यात येईल. |
| ८ | लेखी परीक्षेतील गुणवत्ता क्रमानुसार पात्र उमेदवारांची | दिनांक ०८.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | १ .तहसील कार्यालय,शिरुरकासार<br>२. उपविभागीय अधिकारी |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अटी व शर्तीच्या अधिन राहुन तात्पुरती यादी प्रसिध्द करणे | | | कार्यालय,बीड<br>३ .जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://beed.gov.in प्रसिध्द करण्यात येईल. |
| ९ | मुळ कागदपत्रांची पडताळणी | दिनांक ११.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | तहसील कार्यालय, शिरुरकासार |
| १० | अंतीम निवड यादी प्रसिध्द करणे | दिनांक १३.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | १ .तहसील कार्यालय,शिरुरकासार<br>२. उपविभागीय अधिकारी कार्यालय, बीड<br>३ .जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://beed.gov.in प्रसिध्द करण्यात येईल. |

२६.काही प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण उद्भवल्यास निवड प्रक्रिया स्थगित किंवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीस राहतील .

२७. उमेदवारांनी उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अपात्र ठरवून उमेदवारी भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल .

२८. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारणा केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

२९ लेखी परीक्षा व कागदपत्रे पडताळणीसाठी येण्या जाण्याचा खर्च उमेदवारास स्वतः करावा लागेल

३० जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसगंत असल्यास शासन निर्णय अंतीम राहील.

३१ वरील अटी व शर्ती ,नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागु राहतील.

३२ सदर जाहिरात विस्तृत व सविस्तरपणे व अर्जाचा नमुना तहसील कार्यालय,शिरुरकासार व उपविभागीय अधिकारी कार्यालय,शिरुरकासार येथील नोटीसबोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

३३ सदर जाहिरात विस्तृत व सविस्तरपणे व अर्जाचानमुना http://beed.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

३४ वरील नमुद जाहीरातीमध्ये /वेळापत्रकामध्ये/निवडप्रक्रियेमध्ये काहीही बदल झाल्यास त्याबाबतची माहीती तहसील कार्यालय,शिरुरकासार, उपविभागीय कार्यालय,बीड येथील नोटीस

Scanned with CamScanner

बोर्डवर तसेच मा.जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांचे http://beed.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

दिनांक:-०४.०८.२०२३.

स्थळ:- शिरुरकासार

सदस्य सचिव
तालुका निवड समिती
तथा
तहसीलदार, शिरुरकासार

अध्यक्ष
तालुका निवड समिती
तथा
उपविभागीय अधिकारी, बीड

Scanned with CamScanner

# कोतवाल पदासाठी अर्जाचा नमुना

| केवळ कार्यालयीन वापरासाठी | |
|---|---|
| अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक व दिनांक | |
| अर्ज केलेला जातीचा प्रवर्ग | |

उमेदवाराचे अलीकडच्या काळातील स्वसाक्षांकित छायाचित्र

प्रति ,

मा.सदस्य सचिव,
तालुका निवड समिती तथा
तहसीलदार, शिरुरकासार जि.बीड .

| | आडनांव | नाव | वडीलाचे/ पतीचे नाव |
|---|---|---|---|
| अर्जदाराचे संपुर्ण नांव मराठी मध्ये:- | | | |
| अर्जदाराची मुळ जात व प्रवर्ग:- | | | |
| अर्जदाराने अर्ज सादर केलेला प्रवर्ग:- (अनु.जाती/अनु.जमाती/विजाअ/भजक/भजब/ भजड/विमाप्र/ इमाव/ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/ अराखीव (खुला) ) | | | |
| महिला आरक्षणातुन अर्ज सादर केला आहे किंवा नाही:- (असल्यास प्रवर्ग नमुद करावा.) | | | |
| अर्जदाराचे मुळ रहिवाशी गांवाचे नांव:- | | | |
| दुरवध्वनी क्रमांक/ मोबाईल क्रमांक | | | |
| अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पिनकोडसह):- | तालुका- शिरुरकासार, जिल्हा-बीड. | | |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| अर्जदाराचा जन्म दिनांक:- | दिवस | महिना | वर्ष |
| अर्जदाराचे दिनांक १८.०८.२०२३ रोजीचे वय:- | दिवस | महिना | वर्ष |
| अर्जदार महाराष्ट्राचा रहिवाशी आहे काय:- (होय/नाही) | | | |
| लिंग:- (पुरुष/स्त्री) | | | |
| उमेदवार विवाहीत आहे किंवा नाही:- (होय/नाही) | | | |

अर्जदाराची शैक्षणिक पात्रता:-

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | बोर्ड/शाळा | एकुण गुण | प्राप्त गुण | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

परीक्षा शुल्क भरणा तपशील:-

| बँकेचे नाव | शाखा | डी.डी.क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

सोबत जोडावयाची कागदपत्रे:-रकान्यामध्ये (होय/नाही) नमुद करावे.

| | | |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र | |
| २. | वयाचा पुरावा (टी.सी./सनद) | |
| ३. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा | |
| ४. | जात प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवार असल्यास) | |
| ५. | जात वैधता प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवार असल्यास) | |
| ६. | उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | |
| ७. | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (नमुना-अ) | |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ८. | परीक्षा शुल्क भरणा केलेला राष्ट्रीयकृत बँकेचा मुळ धनाकर्ष डी.डी. | |

मी सत्यकथन करतो/करते की. वर नमुद केलेली सर्व माहीती खरी व बरोबर आहे. सदरील माहीती खोटी आढळल्यास माझा अर्ज रदद करण्यात येईल व माझ्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची मला पुर्ण जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

उमेदवाराचे स्वाक्षरी व नाव

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ नुसार अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा

## नमुना-अ

## (नियम-४)

मी श्री/श्रीमती/कुमारी----------------------------------------------------------------------------

------------श्री.------------------------------------------------------------------ यांचा/

यांची मुलगा /मुलगी/ पत्नी वय-------- वर्ष, राहणार-----------------------------------------------

तालुका- शिरुरकासार,जिल्हा-बीड याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी कोतवाल या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे .

२) आज रोजी मला-------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या------------------ आहे.( असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

३) हयात असलेली मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

उमेदवाराचे स्वाक्षरी व नाव

Scanned with CamScanner